# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:19.03.2026** **वारः गुरुवार**

1. पायाभूत सुविधांनी सज्ज अशी शंभर औद्योगिक संकुलं उभारण्यासाठी केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी
2. राज्यातील सर्व जमिनींच्या फेरफार नोंदी तपासणार
3. प्लास्टीक फुलांवर कारवाईचे महापालिकांनाही अधिकार
4. 68व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचं पुण्यात उद्घाटन आणि
5. विविध जिल्ह्यांमध्ये गारपीट, वादळीवारे, विजांसह पाऊस, आजही अशाच हवामानाचा इशारा

**केंद्रीय मंत्रीमंडळ निर्णय**

'पायाभूत सुविधांनी सुसज्ज अशी शंभर औद्योगिक संकुलं उभारण्यासाठी केंद्रीय मंत्रीमंडळानं 'भव्य' म्हणजे भारत औद्योगिक विकास योजनेला काल मंजुरी दिली. यासाठी 33 हजार 660 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचं, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं. प्रति एकर - शंभर कोटी रुपयांच्या मदतीनं शंभर ते एकहजार एकरपर्यंत या संकुलांचा विस्तार राहील. कापूस हंगाम 2023-24 करिता भारतीय कापूस महामंडळाला सतराशे अठरा कोटी रुपयांचा MSP निधी देखील मंत्रीमंडळानं मंजूर केला. देशभरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी थेट किंमत समर्थन या निधीद्वारे पुरविण्यात येईल असं वैष्णव म्हणाले.

**कोरे**

कोकण रेल्वेच्या उर्वरित मार्गांचं दुहेरीकरण लवकरच सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत दिली. शिवसेनेचे खासदार रवींद्र वाईकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. कोकण रेल्वे मार्गावरील काम पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त वंदे भारत एक्सप्रेस सेवा सुरू करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. सर्व संबंधित राज्यांनी सहकार्य केल्यास कोकण रेल्वेचा विकास अधिक वेगानं होईल, असंही वैष्णव यांनी स्पष्ट केलं.

**खनिज तेल**

देशात कच्च्या तेलाची उपलब्धता सामान्य असून, तेलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेनं कार्यरत असल्याचं आश्वासन केंद्र सरकारनं दिलं आहे. नवी दिल्लीत आयोजित आंतर-मंत्रालयीन बैठकीदरम्यान, पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्रालयाच्या सहसचिव, सुजाता शर्मा यांनी सांगितलं की, देशांतर्गत एलपीजी उत्पादनात 40 टक्क्यांनी वाढ झाली असून, देशभरातील कोणत्याही किरकोळ विक्री केंद्रावर साठा संपल्याची किंवा तुटवड्याची कोणतीही तक्रार नोंदवली गेलेली नाही. एलपीजीकडून पीएनजीकडे होणाऱ्या दीर्घकालीन संक्रमणाला सहकार्य करण्याच्या अटीवर, सरकारनं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यवसायिक एलपीजीचा अतिरिक्त10 टक्के कोटा देऊ केला आहे असंही शर्मा यांनी स्पष्ट केलं.

**सिलिंडर-नाशिक**

नाशिक जिल्ह्यात भरारी पथकांनी इगतपुरी आणि अभोणा इथं हॉटेल व्यवसायिकांकडून दहा घरगुती सिलिंडर जप्त केले. याठिकाणी घरगुती सिलिंडरचा अवैधरीत्या व्यवसायिक वापर केला जात होता.

**इंधन बचत-धुळे**

इंधन बचतीच्या उद्देशाने, धुळे जिल्ह्यातील बारीपाडा, मोहगाव आणि चावडीपाडा या तीन गावांतील ग्रामस्थांनी पुढील सहा महिन्यांसाठी एलपीजी गॅसचा वापर पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. शहरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांकडं पर्यायी इंधनस्रोत

उपलब्ध नसल्यामुळं त्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी स्वतःहून हा त्याग करण्याचा, देशाहीताच्या अनुषंगानं सर्वोच्च निर्णय घेतल्याचं बैठकीत सांगण्यात आलं.

**<u>प्लास्टीक फुलं</u>**

राज्यात प्लास्टिक बंदी अस्तित्वात असली, तरी बाजारपेठेत प्लास्टीकपासून निर्मित कृत्रिम फुलांचा वाढता वापर शेतकऱ्यांच्या नैसर्गिक फुलांच्या व्यवसायावर परिणाम करत आहे. त्यामुळं प्लास्टिक फुलांच्या बंदीसाठी विशेष सूचना काढण्यात येईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. महानगरपालिकांना अशा प्रकारच्या बाजारपेठांवर कारवाई करण्याचे अधिकार दिले जाणार असून, प्लास्टिक फुलांचा वापर करणाऱ्या सजावट व्यावसायिक, भोजनालयं आणि इतर संबंधित घटकांनाही नोटिस दिली जाईल, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

**<u>फेरफार</u>**

महसूल कायद्यातील कलम 155 चा गैरवापर करून जमिनीच्या नोंदीत फेरफार करणाऱ्या आणि सर्वसामान्यांच्या जमिनी हडपणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर अतिशय कठोर कारवाई करण्यात येईल अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधान परिषदेत केली. तसंच राज्यात असा प्रकार आणखी कुठे झाला याची सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश दिले असून, पुणे जिल्ह्याप्रमाणंच राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील मागील पाच वर्षांतील कलम 155 च्या आदेशांची चौकशी करून दोन महिन्यांत अहवाल सादर केला जाईल असं त्यांनी सांगितलं. पुणे विभागातील फेरफाराच्या अतिगंभीर प्रकरणांवर पुढील सात दिवसांत प्राथमिक कारवाई करुन कृती अहवाल सभागृहासमोर ठेवला जाईल, असं आश्वासन बावनकुळे यांनी दिलं.

**<u>मुद्रांक</u>**

महाराष्ट्र मुद्रांक दुसरी सुधारणा विधेयक 2026, काल विधानसभेत एकमताने मंजूर झालं. सध्या, मुद्रांक शुल्क वसुलीच्या प्रक्रियेत अनेक अडचणी येत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये कमी मुद्रांक भरुन दस्त नोंदवले जातात आणि नंतर ती प्रकरणं उघडकीस येतात. अशा वेळी विद्यमान कायद्यानुसार सहा वर्षांच्या मर्यादेमुळं शासनाला उर्वरित शुल्क वसूल करण्यात अडथळे येत होते. आता सहा वर्षांच्या कालावधीत संबंधितांना नोटीस देणं बंधनकारक करण्यात आलं आहे. त्यामुळं प्रलंबित असलेल्या सुमारे 1 हजार 900 हून अधिक प्रकरणांमध्ये अडकलेला कोट्यवधींचा महसूल वसूल करण्यास मदत होणार आहे, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

**<u>रोजगार</u>**

पुणे जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार मुली आणि महिलांना खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं जिल्हा कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पुणे आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स यांच्याद्वारे चिंचवड इथं काल जागतिक महिला दिनानिमित्त पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात 53 महिला उमेदवारांनी सहभाग नोंदवला आणि ट्रेनी ऑपरेटर, क्षेत्र अधिकारी अशा विविध पदांसाठी मुलाखती दिल्या. पुणे जिल्हा कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता विभागाचे मार्गदर्शन अधिकारी सचिन ढेरे, याप्रसंगी बोलताना म्हणाले...

**महिला दिनाचे औचित्य साधून महिलांकरिता रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले या रोजगार मेळाव्यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पुणे आणि यशस्वी ॲकॅडमी फॉर स्किल यांच्या संयुक्त विद्यमाने विविध नामांकित कंपन्यांना आमंत्रित करण्यात आले व त्यांच्याकडून साधारण चारशे दहा रिक्त पदांची मागणी ही प्राप्त झाली त्या निमित्ताने या रोजगार मेळाव्यासाठी भरपूर महिलांनी व मुलींनी सहभाग नोंदविला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला या रोजगार मेळाव्यामध्ये अनेक मुलींना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.**

**<u>गुढीपाडवा</u>**

आज चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा, मराठी नववर्षांचा प्रारंभ. नवीन वर्षाचं उत्साहात स्वागत करण्यासाठी आज राज्यात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यपाल जिष्णु देव वर्मा, तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे नववर्ष आपल्या सर्वांसाठी सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो. सर्वांना निरामय आरोग्य लाभो आणि यातून लाभणाऱ्या नवचैतन्यातून महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा… मराठीची गुढी आणखी उंच उभी करण्याचा निर्धार करुया ! असं मुख्यमंत्र्यांनी नववर्षाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**साडी**

महाराष्ट्रातील विणकरांच्या हस्तकलेला प्रोत्साहन, तसंच पारंपरिक वस्त्रकलेला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी गुढीपाडव्याचं औचित्य साधून नवी दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदनात आजपासून भव्य महाराष्ट्र साडी प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. कस्तुरबा गांधी मार्गावरीलल महाराष्ट्र सदनात 22 मार्चपर्यंत हे प्रदर्शन सकाळी 11 ते रात्री 9 या वेळेत सुरू राहणार आहे.

**गौ-टेक**

महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि गौ-आधारित उद्योगांचा जागतिक महासंघ, तसंच विविध सेवाभावी संस्थांद्वारे पुण्याच्या कृषी महाविद्यालयात उद्यापासून चार दिवस 'गौ-टेक 26' या प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. गौ-आधारित शेती, अर्थव्यवस्था, ग्रामोद्योग विकास आणि बाजारपेठेला चालना देणं असा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. नवं तंत्रज्ञान, उत्पादनं आणि व्यवसाय संधी या प्रदर्शनातून उपलब्ध होणार असल्यी माहिती पुणे विभागाचे अपर आयुक्त तुषार ठोंबरे यांनी दिली.

**कुस्ती**

पुण्यात वाघोली इथं 68व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचं उद्घाटन काल उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. खेळाडूंनी आखाड्यामध्ये प्रामाणिकपणा दाखवा. आपला खेळ अतिशय चांगल्या प्रकारे सादर करा, असं आवाहन पवार यांनी यावेळी केलं. 22 मार्चपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत चार आखाड्यांमध्ये 15 नवोदित कुस्तीपटूंनाही संधी देण्यात येणार आहे. या स्पर्धेत 42 संघांचे 850 मल्ल सहभागी झाले आहेत.

**पाऊस**

राज्यात कालही कोल्हापूर, सातारा, नाशिक, इत्याद जिल्ह्यांमध्ये वादळी वारे, वीजा, आणि गारपिटीसह पाऊस पडला. मार्चमध्येच कडक उन्हात हैराण झालेल्या नागरिकांना काही ठिकाणी थंडावा मिळाला तर काही ठिकाणी गहू, ज्वारी, हरभरा आणि फळबागांचं मोठं नुकसान झालं.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, दक्षिण कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी गारपीट, विजांसह हलका ते मध्यम पाऊस आणि 50 ते 60 किलोमीटर वेगानं वारे यांच्यासह वादळी पाऊस होण्याची दाट शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.